जय लहुजी जय लहुजी जय लहुजी



# सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य)

## मा. श्री. नामदेवराव चांदणे अध्यक्ष

(लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार महाराष्ट्र शासन मुंबई २०१३)

(48)

मुख्य कार्यालय : आण्णाभाऊ साठे नगर, वडगांव गुप्ता, ता. जि. अहमदनगर. मो. ९७०००

दि. ५ / ६ /२०२३

प्रति,
मा.आमदार निलेश लंके साहेब,
पारनेर विधान सभा, अहमदनगर

विषय : आमदार विकास निधीतून आणाभाऊ साठे नगर, वडगांव गुप्ता येथे सांस्कृतिक भवन आणि पथदिवे मिळण्याबाबत.

महोदय,

वरील विषयान्वये आण्णाभाऊ साठे नगर (मातंग वस्ती) वडगांव गुप्ता, ता. जि.अहमदनगर येथे सांस्कृतिक भवन बांधण्यासाठी आपणास दि.११/०८/२०२० रोजी अर्ज दिला होता त्यानंतर आपणास समक्ष भेटून दि.०९/११/२०२१ रोजी पुन्हा अर्ज दिला. परंतु ३ वर्ष झाले मातंग वस्ती कोणतीही सुविधा मिळालेली नाही.

वडगांवगुप्ता मातंग वस्ती फार मोठी असून आपणास विधानसभा निवडणुकीचे वेळेस सहकार्य करुन भरघोस मताने निवडून दिले. तरी मातंग वस्तीत आमदार निधीतून कोणतेही काम होत नसल्याबाबत.

तरी मा. आमदार लंके साहेबांना नम्र विनंती की, आण्णाभाऊ साठे नगर (मातंग वस्ती) वडगांवगुप्ता येथे सांस्कृतिक भवन बांधून मिळावे तसेच वस्तीमध्ये हॅमॅक्स (पथदिवे) बसविण्यात यावे आणि मातंग समाजास सहकार्य करावे.

टिप : या अगोदर दिलेल्या अर्जाची प्रत सोबत जोडत आहोत.

आपले नम्र

Chandane

नामदेवराव चांदणे
प्रदेश समान्वयक
मो.नं.९२७००४३६९६

जय लहुजी जय लहुजी जय लहुजी



# सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य)

## मा. श्री. नामदेवराव चांदणे अध्यक्ष

(लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार महाराष्ट्र शासन मुंबई २०१३)

मुख्य कार्यालय : आण्णाभाऊ साठे नगर, वडगांव गुप्ता, ता. जि. अहमदनगर.


✲ उपाध्यक्ष ✲
मा. काशिनाथ सुलाख पाटील
मा. भारत पवार
मा. विश्वनाथ आल्हाट सर

✲ सचिव ✲
मा. नितीन डिनकर

✲ सहसचिव ✲
मा. अंकुश मोहिते

✲ खजिनदार ✲
मा. कडूबाबा लोंढे

✲ सहखजिनदार ✲
मा. संजय त्रिभुवन

✲ सदस्य ✲
मा. भानुदास साळवे
मा. ॲड. अनिल नेटके
मा. किशोर वाघमारे
मा. विजय पाथरे
मा. बबन उकिर्डे
मा. डॉ. बाळासाहेब पवार
मा. संजय चांदणे
मा. कांतीलाल उल्हारे
मा. भागचंद नवगिरे
मा. निलेश चांदणे
मा. चंद्रकांत सकट
मा. दत्तु (राजु) रोकडे
मा. राजु पवार


दि. : १०/०८/२०२०

प्रति,

**मा. आमदार निलेशजी लंके साहेब**
**सदस्य, पारनेर–नगर मतदारसंघ**

**विषय : आमदार विकास निधीतून अण्णाभाऊ साठे नगर येथे सांस्कृतिक भवन व कमान (वेस) बांधून मिळणेबाबत...**

महोदय,

वरील विषयान्वये अण्णाभाऊ साठे नगर (मातंगवस्ती) वडगाव गुप्ता, ता. जि. अहमदनगर येथे मातंगवस्ती फार मोठी आहे. त्याचप्रमाणे आपणांस विधानसभा निवडणूकवेळी सहकार्य करुन भरघोस मतांनी निवडून आणले. मातंग वस्तीसाठी मा. आमदार स्व. अनिलभैय्या राठोड यांनी सन १९९३ साली समाज मंदिर बांधून दिले होते. परंतु त्याची पडजड झाली आहे. समाज मोठा असल्याने धार्मिक कार्यक्रम, विवाह सोहळे याकामी कमी पडत आहे. समाज मंदिराच्या पश्चिम बाजुस ७० × १०० फूट मोकळी जागा आहे. या जागेवर आमदार विकास निधीतून मोठे सांस्कृतिक भवन, शौचालये तसेच ऑफीस रुम्स् बांधून मिळावे तसेच वस्तीमध्ये प्रवेश करताना कमान (वेस) बांधून देण्यात यावी.

60

सांस्कृतिक भवन बांधून मिळाल्यास समाज मंदिर व सांस्कृतिक भवन असा मोठा हॉल होईल. या हॉलमध्ये मातंग समाजाच्या मुला–मुलींचे विवाह तसेच धार्मिक कार्यक्रम करण्यास सोपे जाईल.

तरी मा. आमदार निलेशजी लंके साहेबांना नम्र विनंती की, अण्णाभाऊ साठे नगर (मातंगवस्ती) वडगाव गुप्ता येथे सांस्कृतिक भवन तसेच कमान (वेस) बांधून देण्यात यावी व आपल्याच हस्ते या इमारतीचे उद्घाटन करण्यात यावे, अशी मातंग समाजाच्या वतीने विनंती करत आहोत.

आपले नम्र

श्री. नामदेवराव चांदणे
मो. ९२७००४३६९६